आर.सी.सी. ८८/२०२५
निशाणी ४१

दोषारोप

मी, अनंत रा. टेंगसे, न्यायदंडाधिकारी वर्ग –१, अकोले, याद्वारे तुमच्यावर आरोप निश्चीत करत आहे की,

तुम्ही आरोपी

१. **परशुराम बाळचंद्र शेळके,**
वय – ४९ वर्ष , व्यवसाय – शेती,

२. **स्नेहल परशुराम शेळके,**
वय – २१ वर्ष, व्यवसाय – शिक्षण,

३. **सौरभ परशुराम शेळके,**
वय – १९ वर्ष , व्यवसाय – शिक्षण,

४. **शुभम सुनिल शेळके,**
वय – २८ वर्ष ,

५. **सुशांत सुनिल शेळके,**
वय – २६ वर्ष,

६. **स्वप्निल रामदास शेळके,**
वय – २७ वर्ष,

७. **योगेश लक्ष्मण पानसरे,**
वय – ४२ वर्ष,
सर्व रा. पानसरवाडी (अगस्तीनगर),
ता. अकोले, जि. अहमदनगर

वर खालीलप्रमाणे दोषारोप ठरविण्यात येतो की,

तुम्ही आरोपींनी तुमचा समान हेतु साध्य करण्याच्या उद्देशाने दिनांक ०५.०५.२०२५ रोजी सकाळी ०९:०० वाजताचे सुमारास पानसरवाडी, ता. अकोले, जि. अहमदनगर येथे आरोपी क्र. ३ याने

फिर्यादीची पत्नी विद्या हिचा डावा हात पकडून गाऊन फाडून तिला लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केलेत आणि त्याद्वारे तुम्ही **भारतीय न्याय संहिता कलम ७४ सहकलम १९० नुसार** माझ्या न्यायीक कार्यक्षेत्रामध्ये दखलपात्र गुन्हा केला आहे.

दुसरे असे की वर नमुद दिवशी, वेळी आणि ठिकाणी तुम्ही आरोपींनी तुमचा समान हेतु साध्य करण्याच्या उद्देशाने क्र. ३ याने फिर्यादीला दोन्ही पायाच्या गुडघ्यावर व डाव्या हाताचे बोटाला दगडाने मारहाण करून इच्छापुर्वक जखमी केलेत आणि त्याद्वारे तुम्ही **भारतीय न्याय संहिता कलम ११८(१) सहकलम १९०** नुसार माझ्या न्यायीक कार्यक्षेत्रामध्ये दखलपात्र गुन्हा केला आहे.

तिसरे असे की वर नमुद दिवशी, वेळी आणि ठिकाणी तुम्ही आरोपींनी तुमचा समान हेतु साध्य करण्याच्या उद्देशाने फिर्यादीला व साक्षीदारांस लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन इच्छापुर्वक जखमी केलेत आणि त्याद्वारे तुम्ही **भारतीय न्याय संहिता कलम ११५(२) सहकलम १९०** नुसार माझ्या न्यायीक कार्यक्षेत्रामध्ये दखलपात्र गुन्हा केला आहे.

चौथे असे की, वर नमुद दिवशी, वेळी आणि ठिकाणी तुम्ही आरोपींनी तुमचा समान हेतु साध्य करण्याच्या उद्देशाने फिर्यादीकडून व साक्षीदारांकडून सार्वजनीक शांततेचा भंग व्हावा अथवा अन्य गुन्हा घडावा या उद्देशाने त्यांना जाणीवपुर्वक शिवीगाळ करुन शांततेचा भंग करण्यास उद्युक्त केलेत आणि त्याद्वारे तुम्ही **भारतीय न्याय संहिता कलम ३५२ सहकलम १९०** नुसार माझ्या न्यायीक कार्यक्षेत्रामध्ये दखलपात्र गुन्हा केला आहे.

पाचवे असे की, वर नमुद दिवशी, वेळी आणि ठिकाणी तुम्ही आरोपींनी तुमचा समान हेतु साध्य करण्याच्या उद्देशाने फिर्यादीस व

साक्षीदारांस फौजदारीपात्र धाकदपटशा दिलात आणि त्याद्वारे तुम्ही **भारतीय न्याय संहिता कलम ३५१(२) सहकलम १९०** नुसार माझ्या न्यायीक कार्यक्षेत्रामध्ये दखलपात्र गुन्हा केला आहे.

सहावे असे की, वर नमुद दिवशी, वेळी आणि ठिकाणी तुम्ही आरोपींनी तुमचा समान हेतु साध्य करण्याच्या उद्देशाने आरोपी क्र. १ याने फिर्यादीला आणि साक्षीदारांना जिवे मारण्याची धमकी अथवा गंभीर दुखापत करण्याची धमकी देवून फौजदारीपात्र धाकदपटशा दिलात आणि त्याद्वारे तुम्ही **भारतीय न्याय संहिता कलम ३५१(३) सहकलम १९०** नुसार माझ्या न्यायीक कार्यक्षेत्रामध्ये दखलपात्र गुन्हा केला आहे.

सातवे असे की, वर नमुद दिवशी, वेळी आणि ठिकाणी तुम्ही आरोपींनी तुमचा समान हेतु साध्य करण्याच्या उद्देशाने फिर्यादी आणि साक्षीदारांविरोधात बेकायदेशीर जमावाचा जाणीवपुर्वक घटक झालात आणि त्याद्वारे तुम्ही **भारतीय न्याय संहिता कलम १८९(२) सहकलम १९०** नुसार माझ्या न्यायीक कार्यक्षेत्रामध्ये दखलपात्र गुन्हा केला आहे.

आठवे असे की, वर नमुद दिवशी, वेळी आणि ठिकाणी तुम्ही आरोपींनी तुमचा समान हेतु साध्य करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर जमावाचा घटक झालात आणि दंगा केलात आणि त्याद्वारे तुम्ही **भारतीय न्याय संहिता कलम १९१(२) सहकलम १९०** नुसार माझ्या न्यायीक कार्यक्षेत्रामध्ये दखलपात्र गुन्हा केला आहे.

शेवटचे असे की, वर नमुद दिवशी, वेळी आणि ठिकाणी तुम्ही आरोपींनी तुमचा समान हेतु साध्य करण्याच्या उद्देशाने फिर्यादीचे चुलते यांची वॅगनर गाडीच्या काचा फोडून वीस हजार रुपयांपेक्षा जास्त व एक लाख रूपयांपेक्षा कमी रकमेचे नुकसान केले तसेच सदर भांडणात फिर्यादीचे हातातील अंगठी गहाळ होवून नुकसानीस कारणीभूत ठरलात आणि त्याद्वारे

आर.सी.सी. ८८/२०२५
निशाणी ४१

तुम्ही **भारतीय न्याय संहिता कलम ३२४(४) सहकलम १९०** नुसार माझ्या न्यायीक कार्यक्षेत्रामध्ये दखलपात्र गुन्हा केला आहे.

आणि याद्वारे मी तुम्हास असे निर्देश देतो की, तुमचे विरुध्द सदर आरोपांखाली खटला चालविला जाईल.

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2026.04.06 18:28:48 +0530

दिनांक ०६.०४.२०२६ **(अनंत रा. टेंगसे)**
अकोले न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले.

सदरील दोषारोपातील मजकुर आरोपींना त्यांचे भाषेत समजावुन सांगीतला.

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2026.04.06 18:28:52 +0530

दिनांक ०६.०४.२०२६ **(अनंत रा. टेंगसे)**
अकोले न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले.